लोकमत

बुधवार, दि. ६ ऑगस्ट २०२५

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर

## पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची सुचना

पर्यावरण, वने व पर्यावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार यांची अधिसूचना दि. 14/09/2006 व सुधारित अधिसूचना दि. 01/12/2009 अन्वये मे. मॅगनीज ओर इंडिया लिमिटेड या कंपनीद्वारे गुमगांव, खोदेगांव, तेगई, खापा, खापापेठ व राजना, ता. सावनेर, जि. नागपूर येथे गुमगांव आणि खोदेगांव खाणीचे एकत्रीकरण (एकत्रीकरण लीज क्षेत्र-212.736 हेक्टर) आणि मॅगनीज खनिज उत्पादन क्षमता 3,05,200 टन प्रतीवर्ष वरुन 6,05,200 टन प्रतीवर्ष विस्तारीकरणासाठी प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीकरिता प्रकल्प धारकाने अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर केलेला आहे. सदर प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजीत करण्यात येत आहे. लोकसुनावणीचे ठिकाण, दिनांक व वेळ खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे.

सदर प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरणविषयी काम करणाऱ्या संस्था, तसेच सदर प्रकल्पामुळे अन्यप्रकारे प्रभावीत होणारे रहिवासी यांना सदर प्रकल्पासंबंधी विचार, टिका, टिप्पणी तोंडी किंवा लेखी स्वरुपात जाहिर सुनावणी दरम्यान सुध्दा नोंदविता येतील.

सदर जाहीर लोकसुनावणी कंपनीच्या परिसरात खालील ठिकाणी घेण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| **सुनावणीचे ठिकाण** | : | **प्रकल्प स्थळ, गुमगांव माईन मे. मॅगनीज ओर इंडिया लिमिटेड, पो. खापा, ता. सावनेर, जि. नागपूर** |
| **सुनावणीची तारीख** | : | **12/09/2025.** |
| **सुनावणीचे वेळ** | : | **सकाळी 11.30 वाजता.** |

सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरुपात विचार, टिका, टिप्पणी ही जाहीरात प्रसिध्द झाल्यापासुन जाहिर लोकसुनावणीच्या तारखेपुर्वी खालील पत्यावर किंवा इ-मेलद्वारे पाठविण्यात याव्यात.

| प्रादेशिक कार्यालय | उप-प्रादेशिक कार्यालय - 1, |
|---|---|
| महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, 5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर. फोन नं. 0712-2560851 | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, 5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर. फोन नं. 0712-2560851 |
| Email- ronagpur@mpcb.gov.in | Email - sronagpur1@mpcb.gov.in |

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तावेज (इंग्रजी व मराठी) मध्ये खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत. संबंधीत व्यक्ती खालील कार्यालयामध्ये सदर कागदपत्रे कार्यालयीन वेळेत अभ्यासू शकतील.

1) जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
2) जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर
3) जिल्हा परिषद, नागपूर
4) पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, प्रादेशिक कार्यालय, (पश्चिम झोन), तळ मजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हिल लाईन्स, नागपूर-440001
5) पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, 15वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-32
6) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), सायन सर्कल, सायन (पुर्व), मुंबई-22
7) प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, 5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
8) उप-विभागीय अधिकारी, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर.
9) तहसिल कार्यालय, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर.
10) पंचायत समिती, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर.
11) नगर परिषद, सावनेर/खापा, ता. सावनेर, जि. नागपूर.
12) ग्रामपंचायत कार्यालय, खोदेगांव / तेगई, ता. सावनेर, जि. नागपूर.
13) गट ग्रामपंचायत कार्यालय, गुमगांव, ता. सावनेर, जि. नागपूर.

स्वा/-
(धनश्री पाटील)
उप-प्रादेशिक अधिकारी -1, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर